| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय<br>रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |


**प्रेस नोट क्र. १५२** **दिनांक १०/०६/२०२१**

## वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०२ पिडित मुलींची केली सुटका – अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगीरी.

महिला नामे अनिशा चौहान व मंजु मेहता ह्या पुरुष गिऱ्हाईकांकडून वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन शिवारगार्डन, सरदार वल्लभभाई पटेल स्कुल जवळ, मिरारोड पूर्व या ठिकाणी वेश्यागमनाकरीता पुरुष गिऱ्हाईकांना मुली पुरविणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाल्याने, दि. ०७.०६.२०२१ रोजी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. एस.एस.पाटील, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन १३.५० वा. छापा टाकला असता महिला वेश्यादलाल अनिशा राजु चौहान, वय-३० वर्षे ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन त्या मोबदल्यात मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिचेकडून वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रोख रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ प्रौढ मुलींची सुटका करण्यात आली. सदर बाबत महिला वेश्यादलाल व तिची साथीदार मंजु मेहता यांच्या विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे पो.हवा./१९८७ विजय ढेमरे यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २१९/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. संपतराव पाटील, पो.हवा./१९८७ विजय ढेमरे, पो.शि./३६६० केशव शिंदे, म.पो.ना./२८४५ कमल चव्हाण, चालक पोना/२६३८ गावडे यांनी केली आहे.

------oooo------